Website: www.word-pdf-convert.com

## के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय
## अ.प्र.क्र. आरटीएस-६४/निमखेड/०८/२००९-१०

श्री परमेश्वर हरी कव्हळे
मय्यत हरी देवराव कव्हळे यांचा (दत्तकपुत्र)
रा. निमखेड पो. तुळजापूर
ता. देऊळगांवराजा जि. बुलडाणा - - अपिलार्थी

**विरुध्द**

मयत किसन देवराव कव्हळे यांचे वारस
१. श्री रमेश किसन कव्हळे
२. श्रीमती मंदाबाई किसन कव्हळे
दोन्ही रा. निमखेड पो. तुळजापूर
ता. दे.राजा जि. बुलडाणा
३.सौ. बेबीबाई माणिकराव वराडे
रा. नळणी ता. भोकरदन जि. जालना
४.सौ. प्रभाबाई गणपत कोल्हे
रा. गोळेगांव ता. दे.राजा जि. बुलडाणा
५.सौ. पंचफुला चहादु फलके
रा. तपोवन ता.जाफ्राबाद जि. जालना
६.सौ.अहिल्या सखाराम बनकर
रा. सातेफळ ता. जाफ्राबाद जि. जालना
<u>मयत हरी देवराव कव्हळे यांचे इतर वारस पत्नी</u>
७. श्रीमती केसरबाई हरी कव्हळे
८. श्रीमती अन्नपुर्णाबाई हरी कव्हळे
दोन्ही रा. निमखेड पो. तुळजापूर
ता. दे.राजा जि. बुलडाणा
९. तलाठी, निमखेड
ता. दे.राजा जि. बुलडाणा - - प्रतिवादी




**आदेश**

( पारित दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० )

मौजे निमखेड ता. देऊळगांवराजा जि. बुलडाणा येथील गट नंबर ९७ मधील ७.४३ हेक्टर व गट नंबर ९६ मधील ९.५२ हेक्टर जमिनीची अनुक्रमे हरी देवराव कव्हळे व किसन देवराव कव्हळे हयांनी आपसात वाटणी करुन तसा फेरफार क्रमांक ५१ दिनांक १७.६.९२ रोजी रुजु करण्यात आला आहे. सदर फेरफारा विरुध्द उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांचेकडे सदर अपिल प्रकरणातील प्रतिवादी क्रमांक१ ते ६ हयांनी अपिल दाखल केले असता रा.प्र.क्र.आरटीएस-६४/निमखेड/२८/२००७-०८ मधील आदेश दिनांक २५/८/२००९ अन्वये अपिल मंजुर करण्यात येऊन फेरफार क्रमांक ५१ हा रद्द ठरविण्यात आला आहे. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी सदर अपिल दाखल केले आहे. आदेशास स्थगनादेश मिळण्याकरीता स्वतंत्र अर्ज दाखल केला आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात येऊन संबंधीतांना नोटीस काढण्यात आल्या आहेत.

स्थगनादेश अर्जावर अपिलार्थीचे वकिलांचे म्हणणे ऐकून घेतले. प्रतिवादी हयांना संधी देऊनही त्यांनी स्थगनादेश अर्जावर म्हणणे न दिल्याने प्रकरणाच्या निकालापावेतो स्थगनादेश देण्यात आला आहे.

प्रकरणात अपिलार्थीचे वकिलांनी लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. युक्तीवादाचा सारांश असा की अपिलार्थी हे हरी देवराव कव्हळे हयांचे कायदेशिर वारस आहेत. परंतू त्यांना उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांचेंकडील अपिल प्रकरणात पक्षकार म्हणून दाखविले नाही. त्यामुळे त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळालेली नाही. वादातील फेरफारानुसार हरी देवराव कव्हळे हयांचे नांवे गट नं.९७ मधील ७.४३ जमीन आहे. नोंद रद्द झाल्यास अपिलार्थी हयास जमिनीस व ताब्यात मुकावे लागेल. जमिनीस प्रतिवादी क्रमांक रमेश देवराव कव्हळे हे ताब्यास अडथळा निर्माण करीत असल्याने अपिलार्थी यांनी दे.राजा येथे न्यायालयात रे.दि.मु.क्र ७४/२००६ दाखल केलेला आहे. त्यामुळे वादातील फेरफार क्रमांक ५१ रद्द करण्यात येऊ नये. उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांचा दिनांक २५/८/२००९ चा आदेश हा रद्द ठरविण्यात येऊन प्रकरण फेरचौकशीसाठी परत करण्यात यावे.

Website: www.word-pdf-convert.com

प्रतिवादी क्र. १ यांनी लेखीयुक्तीवाद दाखल केला आहे. त्यांच त्यांनी प्रामुख्याने नमुद केले आहे की, अपिलार्थी हे दिवंगत हरि देवराव यांचे कायदेशीर वारस नसल्याने त्यांना सदर अपिल दाखल करण्याचा कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही. प्रतिवादी क्र. ७ श्रीमती केशरबाई यांनी वि.न्यायालयात असा मालमत्ते संबधी असलेल्या दाव्यामध्ये अर्ज दाखल केला की, अपिलार्थी हे कायदेशीर दत्तक पुत्र नाहीत. उप विभागीय अधिकारी बुलडाणा यांनी फेरफार क्र. ५१ हा ९-१२ च्या नोटिसेस न देता व वाटणीपत्र उपलब्ध नसतांना रुजु केल्यामुळे रद्द ठरविलेला आहे. वादातिल गट नं. ९७ व ९६ मधील जमीन हे प्रतिवादी वहिती करीत आहेत. उप विभागीय अधिकारी बुलडाणा यांनी पारित केलेला आदेश हा न्यायोचित असल्याने तो रद्द करण्याचा प्रश्नच उद्‌भत नाही. अपिलार्थीचा अपिल अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

प्रतिवादी क्रमांक ७ श्रीमती केशरबाई हरी कव्हळे यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हा आमचा मुलगा नसून त्यास कायद्यानुसार माझे पती हरी देवराव कव्हळे हयांनी दत्तक घेतले नाही. अपिलार्थीस अपिल दाखल करण्याचा अधिकार नाही. उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांनी वादातील फेरफार क्रमांक ५१ हा तलाठी हयांनी कायद्यानुसार संबंधीतांना नोटीस न काढल्याने रद्द ठरविलेला आहे. हा आदेश उचित असल्याने अपिलार्थीचे अपिल खर्चासह खारीज करण्यात यावे.

अपिलार्थी व प्रतिवादी क्रमांक १ आणि ७ हयांचा लेखी युक्तीवाद, कनिष्ठ कोर्टाचे प्रकरण व त्यात पारीत केलेल्या आदेशाचे अवलोकन व निरिक्षण केले. वाटणीपत्रक नोंदणीकृत नाही. फेरफार रजिष्टरवर संबंधीतांच्या सहया नाहीत. फेरफार मंजूर करतेवेळी पक्षकार उपस्थित असल्याचा पुरावा उपलब्ध नाही हे निष्कर्ष काढून उपविभागीय अधिकारी बुलडाणा हयांनी फेरफार क्रमांक ५१ रद्द ठरविला आहे. त्यांच्या निष्कर्षाशी मी सहमत आहे. सबब प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अपिलार्थीचा अपिल अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी, बुलडाणा यांनी रा.प्र.क्र.आरटीएस-६४/निमखेड/२८/२००७-०८ मधील आदेश दिनांक २५/८/२००९ कायम करण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

(के.एम.कामुर्ती)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

प्रतिलिपी :- उप विभागीय अधिकारी बुलडाणा त्यांच्या फाईला वरील रा.प्र.क्र.आरटीएस-६४ / निमखेड /२८/२००७-०८ सह माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा